पिंपरी चिंचवड महानगरपालिका
मा.महिला व बालकल्याण समिति
कार्यपत्रिका क्रमांक - ८
सभावृत्तांत

दिनांक- १०/२/२०१० वेळ - दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बाल कल्याण समितीची मासिक सभा बुधवार दिनांक १०/२/२०१० रोजी दुपारी २.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारती मधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१. मा.सौ.गावडे सुषमा गोविंद
२. मा.भारती ज्योती सुखलाल
३. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण
४. मा.फुगे सुनंदाताई विजय
५. मा.आशा अंकुश लांडगे

याशिवाय मा.गायकवाड-सहा.आयुक्त,मा.चाकणकर- उपनगरसचिव, मा.जगताप - समाज विकास अधिकारी व मा.जगदाळे-सहा.प्रकल्प अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

------------

खालीलप्रमाणे सूचना मांडणेत आली-

सुचक:- मा.सुषमा गावडे अनुमोदक:-मा. ज्योती भारती

सभा कामकाजासाठी नेमलेल्यावेळी मा.सभापती सभागृहात उपस्थित नसल्याने मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण यांची सभेचे अध्यक्षस्थानी निवड करणेत यावी.

सदर सूचना सर्वानुमते मान्य झाली.

-------

(मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण यांनी सभेचे अध्यक्षस्थान स्विकारले.)

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळेचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले-

विषय क्रमांक - ३) खाजगी क्लासची फी देणेकामी अर्थसहाय्य देणे कामीच्या अटिबाबत-मा.ज्योती भारती व मा.सुषमा गावडे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक - ४) HIV एडस् सारख्या विषयावर जनजागृती करण्याबाबत-मा.आशा लांडगे व मा.सुनंदाताई फुगे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक - ५) ८ मार्च जागतिक महिला दिन कार्यक्रम आयोजित करणेबाबत-
मा.ज्योती भारती व मा.सुषमा गावडे यांचा प्रस्ताव.

-------

दिनांक १३/२/२०१० रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ७) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभाध्यक्ष यांनी प्रकट केले.

-------

| | |
|---|---|
| ठराव क्रमांक- २२ | विषय क्रमांक- १ |
| दिनांक- १०/२/२०१० | विभाग- नागरवस्ती विकास |
| सूचक- मा.सुनंदाताई फुगे | अनुमोदक- मा.आशा लांडगे |

संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.नावियो/२/कावि/१६७७/२००९ दि.२२.१०.२००९

विषय :- मे.मॅक्स टेलीकॉम एज्युकेशन सोसायटी (एम.टेल)पुणे या संस्थेमार्फत प्रशिक्षण देणेबाबत.

विषय क्रमांक १ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

| | |
|---|---|
| ठराव क्रमांक-२३ | विषय क्रमांक- २ |
| दिनांक- १०/२/२०१० | विभाग- नागरवस्ती विकास |
| सूचक- मा. ज्योती भारती | अनुमोदक-मा.सुषमा गावडे |

संदर्भ- मा.अति. आयुक्त यांचे जा.क्र.नावियो/५/कावि/४४/२०१० दि.१५.१.२०१०

मा.अति.आयुक्त यांची शिफारस विचारात घेवुन-

पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील मुलींना यो.क्र.- १० खाजगी क्लासची फी देणेकामी अर्थसहाय्य देणे या योजने अंतर्गत प्रस्तावासोबतच्या प्रपत्र अ प्रमाणे २०० लाभार्थींना प्रत्येकी र.रु.१०००/- प्रमाणे एकत्रित र.रु.२,००,०००/- अदा करणेस तसेच सदर योजनेतील व इतर सर्व योजनांमधील अपात्र असलेल्या व तद्नंतर कागदपत्रांची पुर्तता करणा-या सर्व पात्र लाभार्थींना संबंधित योजनेनुसार अर्थसहाय्य अदा करण्यास व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

<u>सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले-</u>

ठराव क्रमांक-२४ विषय क्रमांक- ३
दिनांक- १०/२/२०१०
सूचक- मा.ज्योती भारती अनुमोदक- मा.सुषमा गावडे
संदर्भ- मा.ज्योती भारती व मा.सुषमा गावडे यांचा प्रस्ताव-

इयत्ता १० वी मध्ये खाजगी क्लासची फी देणेकामी इ.९ वी च्या वार्षीक परिक्षेत किमान ६०% गुण या ऐवजी ४५% गुणांची अट कायम करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------

ठराव क्रमांक- २५ विषय क्रमांक- ४
दिनांक- १०/२/२०१०
सूचक- मा.आशा लांडगे अनुमोदक- मा.सुनंदाताई फुगे
संदर्भ- मा.आशा लांडगे व मा.सुनंदाताई फुगे यांचा प्रस्ताव-

महिला-पुरुष नागरिकांसाठी HIV एडस् सारख्या विषयावर जनजागृती करण्यासाठी " वझिरा " या संस्थेने अत्यंत प्रभावी नाटकनिर्मिती केली असुन सदर संस्थेस मुंबई महानगरपालिका,पुणे महानगरपालिका यांनी प्रयोग करण्यास मान्यता दिली आहे तसेच महाराष्ट्र शासनानेही सदर संस्थेची शिफारस केलेली आहे म्हणून सदर " वझिरा " गणेश निर्मित संस्थेस नाटकाचे प्रयोग करण्यास तसेच प्रत्येक प्रभागामध्ये किमान एक प्रयोग प्रमाणे एक दिवसामध्ये तीन प्रयोगास मान्यता देणेत येत आहे प्रत्येक प्रयोगास रक्कम रुपये ३५,०००/- याप्रमाणे तरतूद मंजूर करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------

ठराव क्रमांक- २६ विषय क्रमांक- ५
दिनांक- १०/२/२०१०
सूचक- मा.ज्योती भारती अनुमोदक- मा.सुषमा गावडे
संदर्भ- मा.ज्योती भारती व मा.सुषमा गावडे यांचा प्रस्ताव-

"दि.८ मार्च जागतिक महिला दिन" मनपाच्या महिला व बालकल्याण समितीच्या मार्फत आयोजित करणे आवश्यक असल्याने यासाठी मनपाच्या चार प्रभागामध्ये विविध सामाजिक, प्रबोधनात्मक कार्यक्रमाचे आयोजन करणेस व त्याकामी येणारे

र.रु.१०,००,०००/- खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------

यानंतर मा.सभाध्यक्ष यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण)
सभाध्यक्ष
महिला व बालकल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८. नगरसचिव कार्यालय,
क्रमांक- नस/९/कावि/ २७५ /२०१०
दिनांक - ११/ २ /२०१०

सही/-
उपनगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रत- सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.